# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १५२ वा बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ईव्हीएम नको, बॅलेट पेपर पाहिजे

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार केव्हाही कोसळू शकते असा दावा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. मंगळवारी एका कार्यक्रमा दरम्यान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर जोरदार निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी जातीच्या जनगणनेला घाबरतात कारण त्यांना भीती आहे की मग प्रत्येकजण आपला वाटा मागू लागेल असे खरगे यांनी म्हटले. आम्हाला ईव्हीएम नको तर बॅलेट पेपरवर मतदान हवे असल्याची मागणी मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.



दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये संविधान रक्षक अभियान कार्यक्रमाला संबोधित करताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे बोलत होते. महाराष्ट्रातल्या निकालानंतर मतदान बॅलेट पेपरद्वारे व्हायला असे खरगे यांनी म्हटले आहे. या मागणीसाठी 'भारत जोडो यात्रे'सारखी मोहीम सुरू करावी लागेल, असेही खरगेंनी म्हटले. मला ईव्हीएम नको आहेत. बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेण्याची आमची मागणी असल्याचे मल्लिकार्जुन खरगेंनी सांगितले.

एससी, एसटी, ओबीसी, गरीब वर्गातील लोक पूर्ण ताकदीनिशी मतदान करत आहेत. पण त्यांची मते वाया जात आहेत. आम्हाला बॅलेट पेपरच्या माध्यमातून मते हवी आहेत. ईव्हीएम मशीन पंतप्रधान मोदीजींच्या घरात किंवा अमित शहांच्या घरात नाहीतर अहमदाबादच्या गोदामात ठेवून द्या. पण आमची बॅलेट पेपरची गरज आहे असाही टोला मल्लिकार्जुन खरगेंनी लगावला.

काही लोक राज्यघटनेचे वरवरचे गुणगान गाता. आतून ते त्याला संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. संविधानाच्या रक्षणासाठी राहुल गांधींनी भारत जोडो यात्रा सुरू केली आणि लोकशाही वाचविण्यासाठी सर्व अल्पसंख्याक पुढे आले. त्यामुळेच आम्ही पंतप्रधान मोदींना रोखू शकलो. आज त्यांचे सरकार बहुमताचे नसून अल्पमतातील सरकार आहे. पंतप्रधान मोदींचे सरकार टीडीपीचे चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या पाठींब्याने उभे आहे. जर कोणी पाठिंबाठिंबा काढला तर हे सरकार पडेल असेही मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

तुम्ही सत्तेत आलात आणि लूट करून अदानी, अंबानी आणि त्यांच्यासारख्यांना देत आहात. या लोकांनी कधीही देशाचा विचार केला नाही. मोदी आणि ते एकमेकांबद्दल विचार करतात. महाराष्ट्राच्या निवडणुकीत अदानींनी महत्त्वाची भूमिका बजावली म्हणून मी हे म्हणत आहे. पंतप्रधान मोदींनी त्यांना खूप संपत्ती दिली आणि ते थांबवू शकले नाहीत. निवडणुकीत ते भाजपच्या वतीने वाटप करत आहेत. त्यांच्यात संस्थात्मक एकात्मतेचा अभाव आहे अशी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली.

## विधानसभेत ईव्हीएमने केला घात?

मुंबई : विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज आपल्या पक्षाचे नवनिर्वाचित आमदार आणि पराभूत उमेदवारांची बैठक बोलावली होती. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित बैठकीत बहुतांश उमेदवारांनी शरद पवारांसमोर ईव्हीएमबाबत रोष व्यक्त केला आहे. ईव्हीएममध्ये मोठ्या प्रमाणात गडबडी झाल्यानेच पक्षाला अपयशाचा सामना करावा लागल्याची भूमिका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पराभूत उमेदवारांसह आमदारांनीही मांडली आहे.



विविध नेत्यांनी ईव्हीएमबाबतचे आक्षेप नोंदवल्यानंतर शरद पवार यांनी याबाबत आपण कायदेशीर लढाई लढणार असल्याचे बैठकीत सांगितल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमबाबत आलेल्या तक्रारींवर न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय शरद पवारांच्या पक्षाकडून घेण्यात आला आहे. यासाठी वकिलांची टीमही नेमली जाणार असल्याचे समजते.

जनआंदोलन उभे करावे लागणार

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीनंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आम्ही ईव्हीएमच्या मुद्यावर जनआंदोलन उभे करण्याच्या विचारात असल्याचे म्हटले आहे. शरद पवार यांनी पुढाकार घेऊन या आंदोलनाचे नेतृत्व करावे, अशी विनंती आम्ही त्यांना केली असल्याची माहितीही आव्हाड यांनी बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, मी कळवा-मुंब्रा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने जिंकलो असलो तरी ईव्हीएममध्ये इतर अनेक ठिकाणी गडबड झाली आहे. त्यामुळे निवडणुका बॅलेट पेपरवरच घेतल्या जाव्यात. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये जर निवडणुका बॅलेट पेपरवर होत असतील तर आपण का घेऊ नयेत? असा सवाल उपस्थित करत जितेंद्र आव्हाड यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

## बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे. -डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### ७५ वी हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.





छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर घम्म सेवा संघ बौद्ध विहार, जय भवानी नगर, सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला जय भवानी नगर येथील धम्म सेवा संघ बौद्ध विहारात ७५ व्या हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्धाटन करताना माजी शिक्षणाधिकारी डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, सदाचरणाने वागणा-यांचा समाजात लोक सन्मान करतात. म्हणून सदाचरण समजून घेण्यासाठी दर रविवारी बौद्धांनी बुद्ध विहारात गेले पाहिजे. ज्यामुळे प्रेरणा मिळते. तथागत अमर्याद ज्ञानाचे धनी होते.

याप्रसंगी किशोर हिरामण पाटील म्हणाले की, मला बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक साहित्य माहीत पडल्याने आज मी बुद्ध विहारात पहिल्यांदा आलो, ज्यामुळे पुनर्जन्म झाल्यासारखे वाटत आहे. रामदास वाघमारे म्हणाले की, विहार व्यवस्थापनाने वर्तनातून सिद्ध करावे की, इतरांनी विहारात का आले पाहिजे? जगात २७ बौद्ध राष्ट्रे आहेत. ताराचंद गायकवाड म्हणाले की, बुद्ध विहार हे धम्म चळवळीचे केंद्र आहे. येथे बालपणापासून मुलांवर संस्कार केले पाहिजेत. अर्जुन चव्हाण म्हणाले की, भूतान सारख्या देशात चौकाचौकात पोलीस पहायला मिळत नाही कारण त्या बौद्ध राष्ट्रात धम्माचे पालन होत असल्याने गुन्हेगारी नगण्य प्रमाणात आहे.

प्रमुख वक्ते श्रावण गायकवाड म्हणाले की, बौद्धांनी २२ प्रतिज्ञांचे पालन केले पाहिजे. पंचशील त्रिशरणानंतर प्रत्येक रविवारी चर्चा सत्राचे आयोजन केले पाहिजे. जगात एकच बुद्ध आहे, ते म्हणजे तथागत बुद्ध होय. तर एकच बोधिसत्व आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. आपण मूळ नागवंशीय लोक आहोत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग लोक हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. विहारात वक्ते, स्पर्धक, वादविवादपट्टू निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे, ज्यातून नवीन पिढी घडेल. बालसंस्कार केंद्रे चालवून बालमनावर संस्कार केले पाहिजेत. यासाठी सत्येंद्र तेलतुंबडे यांनी लाफिंग बुद्धा अंतर्गत प्ले ग्रुप व नर्सरी सुरू करायचे आव्हान केले आहे. ज्यात आपण सहभाग घ्यावा. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्याच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न विचारून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारून सत्याकडे वळण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आज रोजी दिवसभर सभा, संमेलन, बैठकीत मार्गदर्शन केले होते. त्यात २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावलावर पाऊल ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने आज रोजी सकाळ, दुपार व संध्याकाळी अशा तीन सत्रात शहराच्या सिडको, हडको व साकेत नगरात वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन केले आहे. २५ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. म्हणून समाजात समता स्थापित करण्यासाठी अंमलबजावणी व्हावी म्हणून उपाय योजना क्रियान्वित करणे आवश्यक आहे. करिता प्रत्येक बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की त्यांनी केवळ दर रविवारीच नव्हे! तर दररोज बुद्ध विहारात जाऊन चर्चेत सहभागी होण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके, सूत्रसंचालन गौतम पारखे यांनी केले. यावेळी श्रावण गायकवाड यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे उपस्थितांना वाटप केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, रावसाहेब सोनकांबळे, रमेश जोगदंडे, रजनीकांत दिवेकर, अर्जुन चव्हाण, व्ही. बी. गायकवाड, टी. एन. सोनवणे, निर्मला सोनवणे, मधुकर लांडगे, रामदास वाघमारे, मनोज घोडेराव, सिद्धार्थ बनकर, गोविंद वाहूळ, ए. एस. जवंजाळ, इंजिनिअर किशोर पाटील, श्रावण गायकवाड, सुनिता बनकर, मंगला साळवे, कविता डोंगरे, सीमा साळवे, लक्ष्मी गायकवाड, विमल भुजंग, कमल पारखे, अशोक सुरडकर, दत्तू सोनवणे, नेहा आठवले, नामदेव वाकडे, संविधान वाकळे, पुरभाजी पंडित इत्यादी शेकडो उपासक उपस्थित होते. अशाप्रकारे संजय जी केदार यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी देशाच्या सुरक्षेला आव्हान देणा-या प्रत्येक दहशतवादी संघटनेला उत्तर देण्याचे आश्वासन दिले आहे. पंतप्रधान मोदींनी संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त देशवासियांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिला.

तसेच २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला १६ वर्षे पूर्ण होत असतानाच दहशतवादी संघटनांना इशारा दिला आहे. संविधान दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयातील वकील आणि कर्मचा-यांना संबोधित केले. भारतीय राज्यघटनेचे हे ७५ वे वर्ष संपूर्ण देशासाठी अत्यंत अभिमानाचा दिवस आहे.

आज मी भारतीय राज्यघटनेला आणि संविधान सभेच्या सर्व सदस्यांना आदरपूर्वक अभिवादन करतो. लोकशाहीच्या या महत्त्वाच्या सणाचे स्मरण करत असताना आज मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याची वर्षपूर्तीही आपण विसरू शकत नाही. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. भारताच्या सुरक्षेला आव्हान देणा-या प्रत्येक दहशतवादी संघटनेला चोख प्रत्युत्तर दिले जाईल या देशाच्या संकल्पाचाही मी पुनरुच्चार करतो असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी म्हटले.

२६ नोव्हेंबर २००८ साली पाकिस्तानातील १० लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांनी समुद्रमार्गे मुंबईत प्रवेश केला आणि ताजमहाल पॅलेस हॉटेल, ओबेरॉय ट्रायडेंट हॉटेल, सीएसटी रेल्वे स्टेशन आणि नरिमन हाऊससह अनेक महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले केले.

## केज शहरातील संविधान चौक येथे संविधान दिन साजरा

### भारतीय संविधानामुळे लोकशाही जिवंत आहे-नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड

केज/प्रतिनिधी-केज शहरातील संविधान चौक येथे संविधान दिन साजरा करण्यात आला आहे. सर्वप्रथम केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संविधान चौकास पुष्पहार अर्पण करण्यात आले व उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले तर सविधान दिनाचे औचित्य साधून युवकांचे प्रेरणास्थान कालकथीत सुमेध बप्पा शिंदे यांच्या चौकास पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.




यावेळी नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड यांनी सर्व नागरिकांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, भारतीय संविधान दिन हा सर्वात महत्त्वाचा दिवस आहे भारतीय संविधानावर संपूर्ण देश चालत आहे भारतीय संविधानामुळेच लोकशाही जिवंत आहे व भारतीय संविधानामुळे सर्व नागरिकांना जगण्याचा बोलण्याचा अधिकार दिला आहे. जगातील सर्वात उत्कृष्ट संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले आहे म्हणून आपण आज स्वाभिमानाने जगत आहोत व मी नगराध्यक्ष पदावर आहे ती म्हणजे फक्त आणि फक्त संविधानामुळेच आहे असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, बालासाहेब शेटे, लहू जाधव, पत्रकार तात्या गवळी, विवेक बनसोड, वंचितचे शरद धीवार, टाकळी ग्रामपंचायतचे सदस्य जीवन सीरसट, सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाचे अध्यक्ष किरण जोगदंड, उपाध्यक्ष प्रेम मस्के, राहुल इनकर, मोसिन शेख, सुहास समुद्रे, संतोष जावळे, सोनू जोगदंड, समाधान बचुटे, पत्रकार प्रदीप गायकवाड, अशोक धीवार, ओम शिनगारे, सुरज वैरागे, संदेश ताकतोडे, अक्षय जगताप, पत्रकार भागेश अन्नदाते यांच्यासह सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाचे पदाधिकारी उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# 'याचि डोळा, याचि देही'

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला विधानसभा निवडणुकीत जबरदस्त तडाखा बसला आहे. खुद्द त्यांच्या शत्रूलाही कल्पना करता येणार नाही, एवढा मानहानिकारक पराभव त्यांच्या पदरी पडला आहे. गेल्या साठ-पासष्ठ वर्षांपासून शरद पवार राज्याच्या राजकारणात वावरत आहेत. दीर्घ काळापासून त्यांची इथल्या राजकारणावर पकड आहे आणि तरीही त्यांना या निवडणुकीत मोठ्या अपयशाला सामोरे जावे लागले आहे. राजकारणातील त्यांच्या प्रभावाची ही पीछेहाट केवळ अनपेक्षित म्हणता येणार नाही. त्यांच्या राजकारणाने आजवर जी वळणे घेतली, त्याच वळणांनी त्यांना कात्रजच्या अर्थात घसरणीच्या घाटावर आणून सोडले आहे, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत शरद पवार यांनी प्रथम पद्धतशीरपणे उद्धव ठाकरे यांना भारतीय जनता पक्षापासून बाजूला करीत दोन्ही काँग्रेससह सत्ता स्थापन केली. त्याआधी भाजपकडे गेलेल्या आपल्या पुतण्याला अजित पवार यांना परत स्वगृही आणले. ही त्यांची खेळी अडीच वर्षांतच उलटली आणि शिवसेनेतच फूट पडून भाजपने शिंदे शिवसेनेच्या साथीने सत्ता काबीज केली. पवारांच्या चाणक्यनीतीला हा पहिलाच धक्का होता. पुढे वर्षातच पुतणे अजित पवारांनी खुद्द पवारांचाच पक्ष फोडला आणि ते भाजपबरोबर सरकारात सहभागी झाले. हा पवारांना दुसरा जबर धक्का होता; पण मुत्सद्दी पवारांना त्यातून भविष्यात काय घडेल, याचा अंदाज आला नाही, असेच आता निकालावरून म्हणावे लागेल. खरे तर गेल्या १५-२० वर्षांपासूनच अजित पवार आपली नाराजी सातत्याने दर्शवीत होते. मुख्यमंत्रिपदाची संधी येऊनही ती नाकारली गेल्याची त्यांना खंत होती व ती खासगीत व्यक्तही होत होती. पहाटेच्या शपथविधीतून त्यांची ही महत्त्वाकांक्षा उघड होऊनही त्याची फारशी दखल घेण्यात शरद पवार कमी पडले, किंबहुना अन्य काही कारणासाठी त्यांनी पुतण्याच्या अपेक्षांना धूप घातला नाही, असेच म्हटले पाहिजे.

फोडाफोडी ही पवारांचीच देण

देशाच्या राजकारणात काँग्रेसपासून समाजवादी पक्षापर्यंत अनेक पक्षांत फूट पडली; पण ही फूट तात्त्विक पायावर होती. व्यक्तिगत स्वार्थासाठी कोणी पक्ष फोडले नाहीत; पण १९७८ साली पुलोदचा प्रयोग करताना आणि १९९९ मध्ये काँग्रेसशी फारकत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसची वेगळी चूल मांडताना शरद पवार यांनी कोणती तात्त्विक भूमिका घेतली, हे तपासावेच लागेल. त्यामुळेच गेल्या दोन दशकांतील फोडाफोडीच्या ज्या घडामोडी झाल्या, त्याचे जनक शरद पवारच आहेत, अशीच इतिहासात नोंद होईल. त्यांनी निर्माण केलेल्या पायवाटेतून महामार्ग झाला आणि त्याच त्यांच्या करणीतून आपलाच पक्ष फुटल्याचे त्यांच्या नशिबी आले. हा 'पोएटिक जस्टिस' म्हणावा लागेल.

असंगाशी संग

शरद पवार यांनी आपल्या सोबत जे पक्ष घेतले, त्यांचा र्‍हास झाला, असाच इतिहास आहे. त्यांच्या सोबत 'पुलोद'च्या सत्तेत सहभागी झालेला शेतकरी कामगार पक्ष आता नावापुरताच उरला आहे, तर समाजवादी पक्ष औषधापुरताही शिल्लक नाही. विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस यांची वाताहत झाली. शरद पवार यांच्या यापूर्वीच्या दाखल्याचीच यावेळी पुनरावृत्ती झाली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

लोकसभा निवडणुकीवेळी महाविकास आघाडीने चांगले यश मिळवले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी आठ जागांवर यश मिळविले होते. तेव्हा त्यांचा स्ट्राईक रेट ८० टक्के एवढा होता. याउलट विधानसभा निवडणुकीत त्यांनी ८६ जागा लढवल्या. यावेळी त्यांचा स्ट्राईक रेट साडेअकरा टक्क्यांच्या आसपास एवढा कमी झाला. ही घसरगुंडी का झाली, याचे उत्तर त्यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीशी सुसंगत असेल, हे वेगळे सांगायला नको.

बारामती हे पवारांचे संस्थान म्हटले जाते. ते या संस्थानाचे अनभिषिक्त राजे म्हणवले जातात. लोकसभा निवडणुकीत पुतणे अजित पवार यांच्याशी त्यांचा रणसंग्राम झाला. त्यात त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे विजयी झाल्या; पण विधानसभा निवडणुकीत पुतणे अजित पवार यांच्या विरोधात अजित पवारांचे पुतणे युगेंद्र यांना उभे करण्याची त्यांची खेळी अंगलट आली. यावेळी पुतण्याने काका शरद पवार यांच्यावर मात केली. दरवेळी आपल्याला अनुकूल दान मिळेल, ही शरद पवार यांची चाणाक्ष नीती यावेळी अपयशी ठरली.

योगायोगाची काडी

सातार्यात २०१९ च्या लोकसभा पोटनिवडणुकीवेळी श्रीनिवास पाटील यांच्या प्रचार सभेत पाऊस आला. पवार पावसात भिजले आणि पुढे श्रीनिवास पाटील विजयी झाले. इचलकरंजीत विधानसभा निवडणूक प्रचारावेळीही पाऊस आला आणि पवार पावसात भिजले, तेव्हा प्रचार सभेवेळी पाऊस आला की विजय मिळतो, असे विधान पवारांनी केले. असल्या योगायोगाच्या काडीचा आधार त्यांना घ्यावा लागला. यातच बहुधा त्यांना पराभवाची चाहूल लागली असावी, असाही निष्कर्ष काढता येतो.

'त्या' निर्णयाची उपेक्षा

लाडकी बहीण, तीर्थदर्शन, वेगवेगळ्या जातिपातींची कल्याणकारी महामंडळे अशा महायुती सरकारच्या निर्णयांचा मतदारांवर प्रभाव पडू शकेल व त्याला तोडीस तोड जबाब द्यावा लागेल, हे चाणाक्ष चाणक्य शरद पवार यांच्या ध्यानात येऊ शकले नाही. उबाठा आणि काँग्रेसच्या राज्य नेतृत्वाकडून याबाबत काही अपेक्षा नव्हती; पण दीर्घ अनुभव असलेल्या पवारांना या निर्णयाचे परिणाम कळू शकले नाहीत, हे खरे तर आश्चर्य म्हटले पाहिजे. या निर्णयाची त्यांनी उपेक्षाच केल्याचे दिसून आले आणि त्याचा परिणाम जाणवला. संजय राऊत, नाना पटोले यांच्या बेफाम वक्तव्यांना लगाम घालावा, हेही आघाडीचे सूत्रधार म्हणून त्यांना जमले नाही किंवा सुचले नाही. या सार्याचा परिणाम व्हायचा तो झालाच. हे त्यांचे वैयक्तिक अपयशच म्हटले पाहिजे.

# स्वातंत्र्य देशाच्या संविधानाला निवडणुका घेऊन जाहिर श्रद्धांजली?

भारत देश स्वातंत्र्य व्हावा यासाठी ज्यांनी कोणत्याही संघर्ष केला नाही, ते लोक आज सत्ताधारी बनून स्वातंत्र्य देशाच्या संविधानाला निवडणुका घेऊन जाहिर श्रद्धांजली देऊन,देशाच्या सार्वजनिक उद्योग क्षेत्रातील लक्षवेधी कंपन्या बिनबोभाट बिनधास्तपणे दोन उद्योगपतीना विकत आहेत.देशातील कष्टकरी कामगार,शेतमजूर,शेतकरी,छोटा व्यापारी,लघु उद्योजक,असंघटीत स्वातंत्र्य देशात स्वतंत्र नाही.चारीबाजूने त्याला गुलाम बनविण्याचे षड्यंत्र अगदी सनदशीर मार्गाने होत आहे.त्याविरोधात सनदशीर मार्गाने आंदोलने करण्याचा अधिकार सुद्धा राहिला नाही.प्रत्येक अन्याय अत्याचाराच्या विरोधात आंदोलन करणारा आंदोलनजीवी झाला.भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी आंदोलने केली ते स्वातंत्र सेनानी म्हणून गौरविण्यात आले होते. त्यामुळेच जगात भारताला गौरवशाली देश म्हणून ओळखले जाते.

भारतातील विविध जातीचे धर्माचे लोक एकत्र,गुण्या गोविंद्याने का नांदतात?.त्यांचे संपूर्ण श्रेय हे भारतीय संविधान याला आहे, १५ ऑगस्ट १९४७ देश स्वतंत्र झाला, आणि २६ जानेवारीला १९५० ला हा देश प्रजासत्ताक झाला.म्हणजे लोकांनी लोकांन करीता लोकशाही ने लोकातुन निवडून दिलेले लोक म्हणजे आमदार,खासदार ते या देशाचा सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक आणि राजकीय कारभार निपक्ष निर्भीडपणे निस्वार्थी पणे चाल-वतील, त्याचे योग्य ते मानधन ते घेतील,देशातील सर्व समाजा करीता विकास आणि कल्याणकारी योजना प्रामाणिक पणे राबवितील या करीता त्यांना समाजसेवा देशसेवा करण्या करीता विविध सुख सुविधा देण्याची तरतूद भारतीय संविधानात केली होती.आमदार खासदार हे समाजातील प्रामाणिक व चरित्रवान समाजसेवक असतील तेच निवडणुका लढतील त्यांनाच लोकांनी निवडूण द्यावे,भांडवलदार, सावकार,भ्रष्टाचारी देशद्रोही गुन्हेगार प्रवृतीच्या आणि विषमतावादी विचारधारेच्या लोकांना लोकांनी निवडूण देऊ नये असे संविधान सांगते. त्याचं मूल्याची हत्या करून सत्तेचा वापर करीत आहेत.म्हणूनच आजच्या परिस्थितीत राज्यातील, केंद्रातील सरकारने स्वातंत्र्य देशाच्या संविधानाला निवडणूक घेऊन जाहिर श्रद्धांजली वाहिली असे म्हणावे काय?.

आमदार खासदारांना मुबलक पगार,भत्ते,आणि पेन्शन का?. ते देशातील नागरिकाचे रक्षण करण्यास सैदव्य तयार असतात काय?. देशात पुर आला आर्मी बोलवा.देशात कुठे ही भुकंप आला आर्मी बोलवा.देशात कुठे ही अतिरेकी हल्ला झाला आर्मी बोलवा.कोणाचे पोरगा बोर मधे पडला आर्मी बोलवा.मग १५ ऑगस्ट २६ जानेवारी च्या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून नेते कशाला बोलवतात?. इथे पण आर्मी का बोलावली जात नाही?. म्हणजेच स्वातंत्र्य देशाच्या संविधानाला जाहिर श्रद्धांजली नाही काय?.भारतीय जनतेने कष्ट करून,घाम गाळुन काम करायचे व विविध कर भरून भिकारी,कंगाल व्हायचे आणि तोच जनतेचा पैसा आमदार खासदार,सरकारी कर्मचारी अधिकऱ्यांनी लाटून खायचा हिच देशाला लागलेली किड आहे.इंग्रज चांगले होते पण स्वातंत्र्य मिळाले आणि संधिसाधुनी आपली खिसे भरायला सुरूवात केली. आमदारांच्या पगारवाढ व पेन्शनवाढ यासारखी भरीव ऐतिहासिक व महत्वाची कामगीरी करणाऱ्या सरकारचा जाहीर सत्कार व अभिनंदन करायचे की त्यांना कायमची मुठमाती दयाची.

शेतकरी आत्महत्या करत असतांना समयसूचकता व कार्यतत्परता सरकारने दाखवून दिली नाही,मात्र गरीब आमदारांच्या कुटूंबावर येणारी उपासमारीची नामुष्की टाळण्यासाठी आमदार वेतनवाढ,भत्ते,पेन्शनचा निर्णय काही सेकंदात घेऊन टाकला. त्या करीता एवढ्या संवेदनशील सरकारचे मुख्यमंत्री,मंत्री,विरोधी पक्षनेते व सर्व सत्ताधारी व विरोधी आमदार या सर्वांचे कोटी कोटी आभार मानले पाहिजे.कारण त्यांनी स्वातंत्र्य देशाच्या संविधानाला जाहिरपणे श्रद्धांजली अर्पण करून स्वार्थ साधून घेतला.आमच्या कृषिप्रधान देशात शेतिमालाला योग्य भाव मिळत नाही शेतात रात्र दिवस काम करून मजूरीचा एकूण हिशेब केला तर उत्पादित मालात खर्च आणि मजूरी निघत नाही.या बाबत गेल्या विसवर्षा पासुन शेतकऱ्यांची ओ-रड चालू आहे. त्यावर चर्चा करून निर्णय घेण्याची गरज सत्ताधारी आणि विरोधी आमदारांना वाटली नाही.आमदारांच्या वेतनवाढ,भत्ते पेन्शन वर कोणतीही गंभीर चर्चा न होता तत्काल निर्णय होतो हीच खरी भारतीय संविधानाला जाहिर श्रद्धांजली नाही काय?.



गिरणी कामगारांना गिरण्याची जमीन विकुन त्यांची देणी आणि हक्काची घरे द्यावी या करीता दर अधिवेशनात फ़क्त चर्चा होते पण गिरणी मालकावर कडक करवाई होण्या बाबत निर्णय होत नाही,बांधकाम क्षेत्रातील असंघटित कामगारांची नांव नोंदणी बिल्डर्स,ठेकेदार यांनी करून घ्यावी याची जाहिरात वृतपत्रात देऊन आवहान केल्या जाते पण अंमलबजावणी करीता ठोस निर्णय सत्त-ाधारी आणि विरोधी पक्षाचे आमदार घेत नाही कारण त्यात त्यांचे आर्थिक हित संबंध गुंतलेले असतात,त्यामुळे असंघटित कामगार मजुरांचे मुक्त पणे शोषण केले जाते.त्यांना किमान वेतन नाही,नांव नोंदणी करून सामाजिक सुरक्षा नाही. पेन्शन आरोग्य विमा नाही.कायदे आहेत पण अंमलबजावणी नाही, ज्यांच्या बहुसंख्य मतदाना वर हे आमदार म्हणुन निवडूण जातात त्यांची दखल हे आमदार घेत नाही.त्यांच्या समश्यावर चर्चा करून निर्णय घेण्यास यांना वेळ नाही, देशातील समस्त शेतकरी दुष्काळाने होरपळणारे आणि सावकारी,सरकारी सोसायटीच्या कर्ज वसूलीने होरपळणारे यांना दिसत नाही.

गिरण्या कारखाण्या मधील कामगार वर्ग जागतिकीकरण आणि खासगी करणांमुळे संघटित कामगारवर्ग असंघटित कामगार मजूर म्हणुन देशोधडीला लागला.त्यांची सुशिक्षित तरुण मुलमुली सुशिक्षित बेकार म्हणुन बेकार फिरतात त्यांची गांभीर्याने दखल घेऊन ठोस उपाय योजना तयार करावी असे सत्ताधारी आणि विरोधी आमदारांना वाटत नाही.देशातील शिक्षण व्यवस्था आणि आरोग्य व्यवस्था यांनी धंदेवाहिक करून ठेवली त्यामुळे यांच्यावर संपूर्ण नियंत्रण भांडवली वर्गाचे आहे. त्यात बहुसंख्य आमदार खासदार कुटुंबाचीच मक्तेदारी आहे.भारतीय संविधाना नुसार ही एकूण व्यवस्था आणि व्यवस्थापन चालली असती तर आमदार खासदार निवडून देणारा बहुसंख्य शेतकरी,शेतमजूर आणि असंघटीत कामगार सर्व सुख समाधानाने जगला असता,त्यानेच आपले बहुमूल्य मतदान सत्त-ावीस पैशाला या गद्दार लोकांना विकले म्हणुन हे आमदार खासदार लोकशाहीची सर्व मूल्य गुंडाळून आपल्या भांडवली आर्थिक शक्तीचे प्रदर्शन करून देशाचे आर्थिक संपत्ती आपली खासगी संपत्ती म्हणुन लुटतात.त्यांना भारतीय संविधानातील तरतुदी असमर्थ ठरल्या म्हणुन त्यांनी विधानसभा,संसद भवनात संविधानालाच निवडणूक घेऊन जाहीर श्रद्धांजली वाहिली असे लिहणे चुकीचे ठरणार नाही.

देश स्वातंत्र्य मिळाल्यापासून आता आपण ७५ वर्षात पदार्पण करीत असतांना. आजच्या परिस्थितीत तेव्हाच्या परिस्थितीची तुलना करता येईल काय?.ब्रिटिशांच्या जाचाला कंटाळून ज्या पद्धतीने भारतवाशीयानी आंदोलने केली त्याच पद्धतीने आज भारतीय नागरिकांना करावी लागतील अशी परिस्थिती आज देशात आहे.त्यांच्या संघर्षाचा इतिहास आजच्या तरुणांनी वाचणे आवश्यक आहे.तरच तो भविष्यात ताट मानाने जगण्यासाठी संघर्ष करेल.

------------

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,भांडूप मुंबई.

# महाविकास आघाडीमध्ये आपसी तालमेलच्या अभावामुळे दारूण पराभव.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर देशासह जगाचे संपूर्ण लक्ष होते.कारण महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या निवडणुकीला आगळेवेगळे महत्त्व होते.त्यामुळे महायुतीसह भाजपचे संपूर्ण लक्ष महाराष्ट्रावर होते.त्याच पध्दतीने त्यांनी व्युहरचना आखली. परंतु महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये आपसी तालमेलचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून आला. कारण निवडणुकीच्या आधीच उध्दव ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री पदाचा दावा होत होता, त्याचप्रमाणे शरद पवार गटाकडून जयंत पाटील यांच्या नावाची चर्चा होत होती तर दुसरीकडे कॉंग्रेसकडुन बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण व नाना पटोले यांच्या नावा-ची चर्चा अशाप्रकारे तीन्ही पक्ष मुख्यमंत्री पदाची दावेदारी करतांना दिसत होते.त्याचप्रमाणे जागा वाटपामध्ये शेवटपर्यंत मोठ्या प्रमाणात रस्सीखेच दिसून आली व लहान भाऊ -मोठा भाऊ अशी चर्चा रंगु लागली.कारण महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना लोकसभेच्या विजयाचे घमंड आले होते.आपण जर महाविकास आघाडीचा लोकसभा निवडणुकीतील विजयाचा विचार केला तर त्यांच्या खासदारांच्या तुलनेत प्रत्येक खासदारांच्या मतदार क्षेत्रातुन कमीत कमी ४ आमदार तरी निवडून यायला पाहिजे होते.परंतु प्रत्येक खासदारांच्या तुलनेचा विचार केला तर एका खासदारांच्या मतदार क्षेत्रातुन फक्त १.५० खासदार निवडून आल्याचे दिसून येते. म्हणजेच कॉंग्रेसचे – १६, उध्दव ठाकरे गटाचे–२० व शरद पवार गटाचे १० अशाप्रकारे महाविकास आघाडीचे ४६ आमदार निवडून आलेत.एका खासदार क्षेत्रात कमीत कमी ६ आमदार असतात त्या पध्दतीने लोकसभा क्षेत्रानुसार महाविकास आघाडी अर्धेही आमदार निवडून येवू शकले नाही ही महाविकास आघाडीच्या बाबतीत शोकांतिका म्हणावी लागेल.महाविकास आघाडीच्या काही लोकसभा क्षेत्रात तर संपूर्णपणे सुपडा साफ झाल्याचे सुध्दा दिसून आले. यावरून असे लक्षात येते की महाविकास आघाडीला वाटत होते की आपल्या जवळ २९ खासदार आहेत म्हणजेच जवळपास आपले १४५ आमदार अवश्य निवडून येतील असे गृहीत धरून निश्चिंत होते आणि हाच अहंकार आज त्यांच्या मानगुटीवर बसला व पराजयाचे कारण बनले आहे आणि आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की विरोधी पक्षनेते पदासाठी पाहिजे असलेल्या २९ जागा सुध्दा आघाडीतील कोणताही पक्ष प्राप्त करू शकला नाही हे मोठे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आघाडीचा अहंकाराचा व त्यांच्यातील आपसी तालमेलचा अभाव याचाच सटीक आणि अचुक फायदा महायुतीतील घटक पक्ष भाजप, शिंदे गट व अजित पवार गट यांनी घेतला आणि त्याच पद्धतीने गेल्या सहा महिन्यांपासून त्यांनी कामाला सुरुवात केली.त्यामुळेच आज महायुतीला भरघोस यश प्राप्त झाले व महाविकास आघाडीला ४६ जागांवर रोखण्यात यश प्राप्त झाले.

-----------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ज्येष्ठांमधील न्यूमोनिया : लक्षणे आणि उपचार

'न्यूमोनिया' हा श्वसनमार्गाचा एक जीवघेणा संसर्ग आजार असून, यामध्ये फुफ्फुसातील पेशींना सूज येते. फुफ्फुसात हवेच्या अत्यंत छोट्या-छोट्या पिशव्या असतात. यांना 'अल्वेओली' असं म्हटलं जातं. यामध्ये जंतूसंसर्ग झाल्यामुळे न्यूमोनिया होतो. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत कोणालाही 'न्यूमोनिया'चा त्रास होऊ शकतो.

ज्येष्ठांच्या शरीराची प्रतिकारशक्ती वयपरत्वे फारशी चांगली नसते. त्यामुळे औषधे दिली तरी फारसा परिणाम होत नाही. शरीर रोगाशी लढण्यास तितकंसं सक्षम राहत नाही, शरीराची रोगप्रतिकारक शक्ती उपचारांना योग्य प्रतिसाद देऊ शकत नसल्याने तब्येत आणखी बिघडते आणि रोगही वाढतो. प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्यामुळे न्यूमोनिया होतो. अशावेळी फुफ्फुसावर परिणाम होऊन त्यांची मारक क्षमता वाढते. छातीत दुखणे आणि खूप ताप यासारख्या लक्षणांसह वयस्कर रुग्णांमध्ये गोंधळ उडणे किंवा हालचाल अचानक कमी होणे यासारखी लक्षणे दिसतात आणि त्यांना अचानक रुग्णालयामध्ये दाखल करावे लागते.



कारणे

वृद्धांमध्ये न्यूमोनिया अनेक अंतर्गत कारणांमुळे उद्भवतो, जसे की वाढत्या वयामुळे कमकुवत झालेली रोगप्रतिकारक शक्ती, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), मधुमेह किंवा हृदयरोग, जीवनशैलीचे घटक जसे की आहाराच्या चुकीच्या सवयी किंवा शारीरिक हालचालींच्या अभावामुळे फुफ्फुसाचे कार्य कमकुवत होऊ शकते आणि लवकर बरे होण्याची क्षमता कमी होते.

लक्षणे

खोकला, ताप आणि थंडी वाजून येणे, छातीत दुखणे, थकवा येणे, धाप लागणे आणि जलद श्वास घेणे. यामुळे दैनंदिन कामे सहजतेने करण्याच्या क्षमतेत व्यत्यय येऊ शकतो. वृद्ध लोकांमध्ये गोंधळ उडणे, श्वास घेताना दम लागणे, शरीराचे तापमान वाढणे आणि छातीत असह्य वेदना होणे यासारखी लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

निदान

निदान करण्यासाठी रक्त चाचण्या, सीटी स्कॅन आणि एक्स-रे च्या मदतीने याचे निदान केले जाऊ शकते. डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

उपचार

उपचारांमध्ये अँटिबायोटिक्स, अँटिव्हायरल औषधे आणि सपोर्टिव्ह केअर तसेच पुरेशी विश्रांती घेणे यांचा समावेश आहे. वेळेवर उपचार केल्यास श्वसनक्रिया बंद पडणे, फुफ्फुसासंबंधित सिस्ट, सेप्सिस, फुफ्फुसात द्रव साचणे आणि मृत्यू ओढावण्यासारख्या गुंतागुंत टाळण्यास मदत होईल.

न्यूमोनिया टाळण्यासाठी

न्यूमोकोकल आणि इन्फ्लूएंझा लस घेणे, हातांची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, मास्कचा वापर करणे, वारंवार स्पर्श केलेल्या पृष्ठभागाचे निर्जंतुकीकरण करणे, गर्दीच्या ठिकाणी फिरणे टाळावे. तसेच आजारी व्यक्तींशी थेट संपर्क टाळा, धूम्रपान टाळा, संतुलित आहाराचे सेवन करा. न्यूमोनियापासून बचाव करण्यासाठी दररोज व्यायाम करा, पुरेशी झोप घ्या आणि फुफ्फुसांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी शरीर हायड्रेटेड राखा.

# साहित्यिक उत्तम तरकसे साहित्य भ्रमन पुरस्काराने सन्मानित

औरंगाबाद (छ. संभाजीनगर) :– हॉटेल मोदी ग्रँड अदालत रोड संभाजीनगर येथे प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्राच्या वतीने अकरावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ – कवी साहित्यिक. विचारवंत मा. श्री उत्तम दासु तरकसे आसरडोकर यांचा नुकत्याच प्रकाशित झालेल्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला या अगोदर वेगवेगळ्या संस्थेचे सात पुरस्कार उत्कृष्ट साहित्य वाङ्मयाचे मिळाले असून सदरच्या संस्थेचा अतिउच्च मानाचा अलौकिक उत्कृष्ट साहित्य भ्रमर पुरस्कार २०२४ या पुरस्कारास साठी सुद्धा सदर काव्यसंग्रहाची निवड झालेली असून सदर कार्यक्रमात तो सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार होता परंतु सदरच्या काव्यसंग्रहाचे कवी मा. श्री उत्तमराव दासू तरकसे हे विधानसभा निवडणूक २०२४ या ड्युटी मध्ये व्यस्त असल्याने सदरचा कार्यक्रमात हजर राहू न शकल्याने सदरचा पुरस्कार त्यांना विधानसभा निवडणूक २०२४ ची ड्युटी संपल्यानंतर संस्थेच्या कार्यालयात आमंत्रित



करून त्यांना संस्थेचे सचिव श्री मकरंद घाणेकर (ज्येष्ठ साहित्यिक) यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला

सदरचा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान केल्यानंतर मा. श्री उत्तमराव तरकसे यांनी सदरच्या पुरस्कारासाठी माझ्या काव्यसंग्रहाची निवड केल्यामुळे संस्थेच्या अध्यक्षा सौ लीना देगलूरकर सचिव मकरंद घाणेकर व इतर सर्व पदाधिकारी व पुरस्कारासाठी नेमलेल्या निवड समितीचे सर्व पदाधिकारी यांचे मनापासून खूप खूप आभार व्यक्त केले

# भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा- गुणवंत मिसलवाड

नांदेड / प्रतिनिधी :– जगातील २४३ देशांच्या पाठीवर भारतीय लोकशाही ही सर्वश्रेष्ठ लोकशाही असून भार–तातील तळागाळातील माणसांसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य विकासात्मकदृष्ट्या व देशाची अखंडता अबाधित ठेवून समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय ही मूल्ये राज्यघटनेने प्रदान केलेली असून भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा आहे, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. २६ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता ७५ वा भारतीय संविधान दिन (अमृत महोत्सवी वर्ष) म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या संविधान दिन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सर्वप्रथम आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते संविधान उद्देशिका (प्रियाम्बल) तैलचित्र प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, भार–तरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ आंतरराष्ट्रीय देशांच्या कायद्याचा अभ्यास करुन दोन वर्षे ११ महिने



१८ दिवस अहोरात्र मेहनत घेऊन आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर राज्यघटनेत ३९५ कलमे, १२ परिशिष्ट सामावून महान असा भारतीय संविधान ग्रंथ या भारत देशाला सुपूर्द केला म्हणून आज प्रत्येक भारतीय नागरिकांनी संविधान रक्षणाप्रती सजग राहून संविधानाचे वाचन करणे ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करुन आगारातील सर्व कामगार– कर्मचार्यांना उद्देशिकेची शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आग–ार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ, वाहतुक नियंत्रक सुनील मोरे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, सुनीता हुंबे, श्वेता तेलेवार, शिल्पा ढवळे, वैष्णवी गंदेवार, मनिषा कदम, संगीता वाघमारे, प्रियंका खरात, वाहक रविचंद्र पांडागळे, श्रीकांत अंकुशे, कृष्णा पवार, संजय मंगनाळे, संदीप देशमुख, शिव–चरण मळगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार– कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

लातूर :– भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४–२५ या अमृत महोत्सवी वर्षात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने आज संविधान दिनानिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरीक यांच्यापर्यंत पोहचावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधान दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथेही भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच येथील भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेला पुष्पांजली अर्पण केली. तसेच उपस्थित नागरिकांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधी–केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भीमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नेते सुभाष सोनवणे, माजी अध्यक्ष बाबासाहेब मस्के, वंचितचे ज्येष्ठ नेते धनराज सोनवणे, वंचितचे युवा नेते शरद धीवार, आरपीआयचे रा–हुल सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संविधानाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्व उपस्थित पत्रकार बांधवांनी वंदन केले. यावेळी पत्रकार प्रतिनिधी म्हणून गौतम बचुटे व रंजीत घाडगे यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांना संविधानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सुभाष सोनवणे यांनी संविधानाची प्रस्ता–वना वाचून संविधानाचे महत्त्व सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना चंद्रकांत खरात सर यांनी सांगितले की, संविधान दिन का साजरा करायचा व संविधान दिनाचे महत्त्व काय यावर त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी पत्रकार रामदास तपसे, रमेश इतापे वसंत सोनवणे, महादेव काळे, तात्या गवळी, रंजीत घघाडगे, बापू वैरागे, गौतम बुचुटे, प्रदीप गायकवाड, बालासाहेब जाधव संजय खळगे सनी शेख, विनोद पवार, महादेव गायकवाड यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महादेव काळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास तपसे यांनी केले उपस्थितांचे आभार बापू वैरागे यांनी मानले.

# ओबीसी –भटके विमुक्त बलुतेदार आरक्षणासाठी; न्या.रोहिणी आयोगाच्या शिफारसी लागू करा–राजेंद्र वनारसे

लातूर :– देशभरातील ओबीसी –भटके विमुक्त बलुतेदार इतर मागासवर्गीयांना प्रवर्गातील मुख्य प्रव–ाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने न्या.रोहिणी आयोग स्थापन केला होता.या आयोगाने त्यांचा अह–वाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे ३१ जुलै २०२३ रोजीच सादर केला आहे. परंतु,४८४ दिवस लोटूनही अद्याप आयोगाच्या शिफारसींसंबंधी कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही म्हणून



दिल्ली येथे गृहमंत्री अमित शहा यांना भेटून निवेदन सादर करणार अशी माहिती राष्ट्रीय संत संदेश पक्ष चे अध्यक्ष राजेंद्र वनारसे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. आयोगाच्या शिफारसी तात्काळ लागू करण्यात याव्यात या मागणीसाठी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू महोदया यांचीही भेट घेणार असल्याचे वनारसे यांनी पत्रकात नमूद केले आहे.

न्या.रोहिणी आयोगाच्या शिफारसी वंचित घटकांना योग्य न्याय देऊ शकतात. आयोगाच्या शिफारसी लागू झाल्या तर ओबीसी मधील उपेक्षित घटकांना विकासधारेत आणता येईल.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर ओबीसी सह संपूर्ण देशा–चा विश्वास आहे.नुकत्याच झालेल्या विविध राज्यातील विधानसभा निवडणुकीत विरोधकांकडून जाती–पाती संदर्भात केल्या गेलेल्या राजकारणाला न्या.रोहिणी आयोगाच्या शिफारसी लागू करून मोदी सरकार चोख प्रत्युत्तर देऊ शकते,असे वनारसे यांनी व्यक्त केले. संसदेचे अधिवेशन सुरू आहे.सरकारने त्यामुळे सभागृहात देखील आयोगाच्या शिफारसींसंबंधी चर्चा करावी. देशातील इतर मागासवर्गीयांच्या ओबीसी उप–वर्गीकरणासाठी २ ऑक्टोबर २०१७ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती जी.रोहिणी यांच्या अध्यक्षतेखाली 'रोहिणी आयोग' स्थापन करण्यात आला होता.अनेक वेळा मुदतवाढ दिल्यानंतर रोहिणी आयागाने तब्बल सहा वर्षांनी त्यांचा अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सादर केला.उपेक्षित, वंचित असलेल्या ओबीसींच्या न्याय हक्कासाठी हा अहवाल सार्वजनिक करावा,अशी मागणी देखील वनारसे यांनी केली. ओबीसींसाठी आरक्षणाच्या लाभांच्या असमान वाटपाच्या मर्यादेचे परीक्षण करणे आणि ओबीसींच्या उप–वर्गीकरणासाठी शास्त्रोक्त पद्धतीने यंत्रणा,निकष आणि मापदंड तयार करण्याची महत्वाची जबाबदारी इतर मागासवर्गीय आयोगाने 'रोहिणी आयोगा'कडे सोपवली होती.ओबीसींच्या केंद्रीय यादीतील विविध नोंदींचा अभ्यास करण्याचे आणि कोणत्याही डुप्लिकेशन, अस्पष्टता यांसारख्या त्रुटींमध्ये सुधारणा करण्याची शिफारस करण्याचे काम देखील आयोगाकडे सोपवण्यात आले होते.प्रत्येक ब्लॉकसाठी आरक्षणाची टक्केवारी मर्यादित करून ओबीसी प्रवर्गातील दुर्बल जातींना सशक्त समाजाच्या बरोबरीने आणण्याचा उप–वर्गीकरण करण्यामागचे मूळ उद्दिष्ट होते.हे मुळे उद्दिष्ट साध्य झाल्यास वंचितांना न्याय मिळेल, असा दावा राजेंद्र वनारसे यांनी केला आहे.

# एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाबाबत कोणताही शब्द दिला नव्हता : रावसाहेब दानवे

नवी दिल्ली : एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाबाबत कोणताही शब्द दिला नव्हता, असे स्पष्टीकरण ज्येष्ठ भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी दिले. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतरही राज्यात सरकार स्थापन होण्यासाठी वेळ लागत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा आहेत. या पार्श्वभूमीवर रावसाहेब दानवे दिल्लीत माध्यमांशी बोलत होते.

रावसाहेब दानवे म्हणाले की, विधानसभा निवडणूक झाली तेव्हा एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात निवडणूक लढणे स्वाभाविक होते. मात्र मुख्यमंत्री कोण होणार, हे निवडणुकीनंतर ठरवू असेच आम्ही म्हटले होते. त्यामुळे मुख्यमंत्री पदाबद्दल त्यांना शब्द देण्याचा प्रश्नच येत नाही, असेही ते म्हणाले. तसंच देवेंद्र फडणवीस शंभर टक्के मुख्यमंत्री व्हावेत कार्यकर्ता म्हणून आमची ती इच्छा आहे असेही ते म्हणाले.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत लातूर येथे आयोजित संविधान रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद





लातूर : – भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधान दिनानिमित्त लातूर येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये नागरिक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे आणि समाज कल्याण प्रादेशिक उपयुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात झाली. समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह विविध पुरस्कारप्राप्त नागरिक, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यावेळी उपस्थित होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार आणि भारतीय संविधान उद्देशिका प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच उपस्थित सर्वांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून सुरु झा–लेली संविधान रॅली गुळ मार्केट, महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर याठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅलीचा समारोप झाला.

श्री केशवराज माध्यमिक विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशीकेंद्र माध्यमिक विद्यालय, ज्ञा–नेश्वर माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला आणि गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी संविधान रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या.

# कोहिनूर इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन साजरा



बीड/प्रतिनिधी–दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी जीएलओडीपी कार्यक्रमांतर्गत धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्यावतीने कोहिनूर इंग्लिश स्कूल येथे संविधान दिनाच्या औचित्य साधून व संविधान दिन साजरा करण्यात आला आहे. लहान मुलांना त्यांचे संविधानिक हक्क व शैक्षणिक हक्क याबाबत खेळाच्या माध्यमातून सविस्तर सांगण्यात आले व बालवयातच संविधानाचे महत्व काय आहे हे त्यांच्या रुजवण्याचा एक छोटासा प्रयत्न संविधान दिनानिमित्त करण्यात आला आहे. संविधानाची प्रस्तावना वाचून इतर वेगवेगळे खेळ घेत लहान मुलांना गुड टच बॅड टच याबाबत सविस्तरपणे अतिशय सोप्या भाषेत त्यांना समजेल अशा भाषेत सांगण्यात आले. यावेळी उपस्थित धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव–बाबासाहेब कोकाटे, संस्थेच्या प्रकल्प समन्वयक– प्रियंका खोब्रागडे,संस्थेचे कार्यकर्ते कोमल यादव, फेलो–अशोक गायकवाड,कोरो इंडियाचे विभागीय समन्वयक–विलास मगरे सर, एकल महिला संघटनेच्या कार्यकर्त्या– रुक्मिणी ताई नागापुरे व १ ते १४ वयोगटातील मुले–मुली उपस्थित होते.

# केज पंचायत समितीला आखेर मिळाले गटविकास अधिकारी

## अर्पिता ठुबे यांनी केज पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला




केज/प्रतिनिधी–केज पंचायत समितीला आखेर गटविकास अधिकारी मिळाले आहेत.अर्पिता ठुबे यांनी केज पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला आहे. केज पंचायत समितीला गेल्या अनेक दिवसांपासून पुर्ण वेळ कारभार संभाळणारा अधिकारी नव्हते पंचायत समिती कार्यालयाचा कारभार हा अतिरिक्त अधिकाऱ्यावरच अवलंबून होता. त्यामुळे या कार्यालया अंतर्गत चालणार्या कामामध्ये बराचसा आवमेळ झालेला होता यामुळे सर्वसामान्य माणसांची प्रचंड गैरसोय झाली होती ,म्हणून त्यांची नाराजी दिसत होती. दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी या पंचायत समितीला एका वरिष्ठ अधिकाऱ्याने कारभार हाती घेतल्याने हे चित्र काहीसे बदललेले पहायला मिळत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, केज पंचायत समितीला गेल्या अनेक दिवसांपासून गटविकास अधिकारी नव्हते. त्यांचे कामकाज अतिरिक्त पदभार देऊन इतरांकडे सोपवण्यात आलेल होते. परंतु यामुळे सर्वसामान्य माणसांच्या अडचणी वाढल्या आहेत. एकुणच पंचायत समितीचा कारभार यामुळे विस्कळीत आणि काहिसा अनियंत्रित झालेला पहायला मिळत होता. या पंचायत समितीला एक नवीन गटविकास अधिकारी म्हणून रूजू झाले आहेत. अर्पीता ठुबे असे महिला अधिकारी यांचे नाव असून त्या आय ए एस असल्याचे समजते यामुळे या पंचायत समितीला त्या केवळ २१ डिसेंबर २०२४ पर्यंत गटविकास अधिकारी म्हणून कामकाज करणार आहेत. परंतु या कालखंडात त्यांचेमुळे या कार्यालयाचा कारभार सुव्यवस्थीत चालेल आणि सर्व सामान्य माणसालाही या ठिकाणी आता सर्व अधिकारी व कर्मचारी वेळ देतील असे वाटते. सोमवारी गटविकास अधिकारी म्हणून मॅडम रूजू झाल्यापासूनच काहीसा माहोल या कार्यालयाचा बदललेला पहायला मिळत आहे. त्यांनी गट विकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारताच पंचायत समिती कार्यालयाच्या कानाकोपऱ्यामध्ये पान व गुटखा खाऊन भिंती रंगवलेल्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ करायला लावल्या आणि २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना आदेश काढले आहेत अशी चर्चा ऐकण्यास मिळाली आहे.

# १५ उमेदवारांची 'डिपाझीट' जप्त किनवट मतदारसंघात ११ उमेदवारांना 'नोटा' पेक्षा कमी मते

किनवट/शेख शौकत–:–किनवट विधानसभेच्या निवडणूक रिंगणातील एकूण १७ उमेदवारांपैकी विजयी उमेदवार महायुतीचे भीमराव केराम व नजीकचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे प्रदीप नाईक वगळता उर्वरित १५ ही उमेदवारांची डिपाझीट रक्कम जप्त झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे किनवट विधानसभेसाठी झालेल्या एकूण मतदानात 'नोटा'ला १,२६६ मते मिळाली असून, निवडणूक रिंगणातील ११ उमेदवारांना 'नोटा' पेक्षा कमी मते पडलेली आहेत.

किनवट विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ७८ हजार ६६५ मतदार आहेत. त्यापैकी 'ईव्हीएम' वरील आणि टपाली मिळून एकूण २ लक्ष ०२ हजार ४९७ एवढे मतदान प्रत्यक्षात झाले. त्यातील 'नोटा'ची १ हजार २६६ मते आणि पोस्टल मतांमध्ये बाद झालेली १३७ मते वगळता एकूण वैध मते २ लाख ०१ हजार ०९४ आहेत. अनामत रक्कम वाचविण्यासाठी उमेदवाराला निवडणुकीत सर्व उमेदवारांना पडलेल्या एकूण वैध मतांच्या सहाव्या हिश्श्याने (एक षष्ठांश) म्हणजेच १६.६६६ टक्के मते मिळाली, तरच संबंधित उमेदवाराला त्याची डिपॉझिटची रक्कम परत मिळते. एकूण वैध मतांची गणना करताना 'नोटा'ला मिळालेली मते विचारात घेतली जात नाहीत. निवडणूक रिंगणात कमीत कमी उमेदवार उतरावेत, तसेच निवडणुकीचे गांभीर्य त्यांना राहावे, म्हणूनच आयोगाने अनामत रकमेची अट घातली आहे. त्यानुसार किनवट विधानसभा क्षेत्रातील उमेदवाराला 'अनामत' राखण्यासाठी किमान ३३ हजार ५१६ मते मिळविणे गरजेचे होते. परंतु, महायुतीचे विजयी उमेदवार भीमराव केराम आणि दुसऱ्या स्थानी राहिलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप नाईक या दोघांतच अटीतटीची झुंज झाली. निवडणूक रिंगणातील तिसऱ्या ते सहाव्या क्रमांकाची मते घेतलेल्या उमेदवारांना सहा हजारांपेक्षा कमी मते मिळाली आहेत. जे की, अनामत (डिपॉझिट) राखण्यासाठी आवश्यक असलेल्या मतांच्या २० टक्केही नाहीत. उर्वरित ११ उमेदवारांना तर नोटाला मिळालेल्या १,२६६ मतांपेक्षा कमी मते पडलेली आहेत. त्यामुळे या १५ ही उमेदवारांवर अनामत रक्कम गमावण्याची नामुष्की आली आहे. किनवटविधानसभाक्षेत्रातभाजपा,रा.कॉ.शरदपवारगट,वंचितबहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, रिपब्लिकन पक्ष खो.री.पा., इंडियन नॅशनल लीग, राष्ट्रीय समाज पक्ष अशा सात पक्षांसह १० अपक्षांचा पर्याय मतदात्यांसमोर होता. किनवट विधानसभेसाठी केल्या गेलेल्या एकूण २ लक्ष ०२ हजार ३६० मतदानांपैकी १ हजार २६६ मतदारांनी उपरोक्त १७ ही उमेदवारांना नापसंती दर्शवीत 'नोटा'चा पर्याय निवडला. जे की, एकूण वैध मतांच्या ०.६३ टक्के इतकी मते आहेत. याशिवाय पोस्टलमध्ये १३७ मते बाद झाली आहेत. १९६२ ते २०२४ या कालावधीमध्ये किनवट विधानसभा क्षेत्रात पार पडलेल्या एकूण १४ विधानसभा निवडणुकीमध्ये (१९९३ ची पोट निवडणूक सोडून) एकूण १४२ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. त्यापैकी आतापर्यंत तब्बल १११ उमेदवारांनी अनामत रक्कम गमावलेली आहे.

अनामत रक्कम जप्त होणे लाजिरवाणी बाब

निवडणुकीत हार–जीत तर होतच राहते; परंतु पराभवामध्ये दोन प्रकार आहेत. यातील दारुण पराभवापेक्षाही भयंकर असते ते 'डिपॉझिट' म्हणजे अनामत रक्कम जप्त होणे. कारण अशा प्रकारे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यानंतर किमान निर्धारित मतेही न मिळाल्यामुळे, अनामत रक्कम जप्त झाल्यास उमेदवाराच्या दृष्टीने ती मोठी लाजिरवाणी बाब ठरते. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार एकूण वैध मतांच्या एकषष्ठांश अर्थात १६.३३ मतेही न मिळवणाऱ्या उमेदवारांची अनामत रकम जप्त केली जाते. भारतीय लोकप्रतिनिधी १९५१ नुसार विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला अर्ज दाखल करताना १० हजार रुपयांची अनामत (डिपॉझिट) रक्कम जमा करावी लागते. अनुसूचित जाती (एस. सी.) आणि अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) उमेदवारांना यातून अर्ध्या रकमेची सूट देण्यात आल्यामुळे त्यांना केवळ ५ हजार रुपये अनामत रक्कम जमा करावी लागते. लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी हीच अनामत रक्कम सामान्य उमेदवारांना २५ हजार रुपये आणि एससी, एसटी साठी १२ हजार ५०० रुपये आहे.

# गावठी कट्टा बाळगणारा इसम ताब्यात. पोलीस ठाणे शिवाजीनगर ची उत्कृष्ट कारवाई.



लातूर :– गावठी कट्टा बाळगणारा इसम ताब्यात. पोलीस ठाणे शिवाजीनगर ची उत्कृष्ट कारवाई . लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके नेमून कार्यवाही करण्यात येत होती.

त्या अनुषंगाने पोलीस ठाणे शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांचे नेतृत्वात पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न होताच दिनांक २४/११/२०२४ रोजी लातूर शहरातील सिताराम नगर परिसरातून एका अल्पवयीन मुलास व एका तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा (पिस्टल) हस्तगत करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर इसम नामे गणेश शेंडगे, वय ३० वर्ष राहणार एलआयसी कॉलनी, लातूर. व सोबत एक अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा जप्त करण्यात आले.

याप्रकरणी पोलीस उप निरीक्षक हनुमंत कवले यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४६४/२०२४ कलम ३ ,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून पुढील तपास शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे चे सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय उत्कृष्टरित्या गोपनीय माहितीचे संकलन व विश्लेषण करून करून गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले आहे तर अल्पवयीन मुलास त्यांच्या पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे व लातूर शहर चे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या नेतृत्वातील पथका मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत कवले, पोलीस अमलदार रणजीत शिंदे, बालाजी कोतवाड, अमित लहाने, काकासाहेब बोचरे, सोनवणे यांनी केली आहे.

# लातूर,नांदेड व पुणे येथून चोरी केलेल्या १० मोटारसायकलीसह एका आरोपीला अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.



लातूर :– लातूर,नांदेड व पुणे येथून चोरी केलेल्या १० मोटारसायकलीसह एका आरोपीला अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २५/११/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील एक गुन्हेगार त्याने चोरलेली मोटरसायकल विकण्यासाठी भामरी चौक परिसरात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक २५/११/२०२४ रोजी सदर पथक तात्काळ भामरी चौक परिसरात पोचून रोडवर मोटार सायकलसह थांबलेल्या इसमाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव लखन वाघम्बर छपरावळे, वय २४ वर्ष, राहणार हिप्पळगाव, तालुका शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहना संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटरसायकल दोन वर्षांपूर्वी लातूर शहरातील ठिकाणावरून चोरी केल्याचे सांगितले. तसेच त्याच्याकडे आणखीन तपास केला असता त्याने लातूर सहीत नांदेड व पुणे जिल्ह्यातूनही मोटरसायकली चोरी करून एमआयडीसी परिसरात लपवून ठेवल्याचे सांगितले. त्यावरून नमूद आरोपीकडून त्याने लातूर नांदेड व पुणे जिल्ह्यातून चोरी केलेल्या एकूण १० मोटरसायकली ज्याची किंमत ३ लाख ५० हजार रुपये असा असून सदरचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे शिवाजीनगर लातूर येथील १ गुन्हा, नांदेड जिल्ह्यातील २ मोटरसायकल चोरीचे गुन्हे, तसेच पुणे जिल्ह्यातील ४ मोटारसायकल चोरीचे गुन्हे असे एकूण ०७ मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

नमूद आरोपीला पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, विनोद चलवाड, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, संतोष खांडेकर, राजेश कंचे, चालक पोलीस अमलदार प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे, यांनी पार पाडली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE